# मिरा भाईंदर महानगरपालिका
## माहिती व जनसंपर्क विभाग
### प्रेसनोट

- **देशाचा ७५वा प्रजासत्ताक दिन मिरा भाईंदर महानगरपालिका मुख्य कार्यालय प्रांगणात केला साजरा**

२६ जानेवारी २०२४ रोजी मिरा भाईंदर महानगरपालिका मुख्य कार्यालयाच्या प्रांगणात सकाळी ०८:१५ वाजता मा. आयुक्त तथा प्रशासक संजय श्रीपतराव काटकर (भा.प्र.से.) यांच्या हस्ते ध्वजारोहण करून देशाचा ७५वा प्रजासत्ताक दिवस साजरा केला गेला. सर्वप्रथम कार्यक्रमाची सुरुवात सकाळी ७:०० वाजता काशीमिरा येथील छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याला पुष्पहार घालून मानवंदना देण्यात आली. त्यांनतर सकाळी ०७:४५ वाजता भाईंदर पश्चिम फाटक येथील महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला पुष्पहार घालून त्यांना वंदन करण्यात आले. प्रसंगी महानगरपालिका अतिरिक्त आयुक्त अनिकेत मानोरकर, अतिरिक्त आयुक्त संभाजी पानपट्टे, उपायुक्त (मुख्यालय) मारुती गायकवाड, उपायुक्त संजय शिंदे, उपायुक्त रवी पवार, उपायुक्त कल्पिता पिंपळे, शहर अभियंता दिपक खांबित, नगरसचिव वासुदेव शिरवळकर, सर्व विभागप्रमुख व अधिकारी वर्ग व महानगरपालिका कर्मचारी उपस्थित होते.

शालेय शिक्षक यांनी ध्वजारोहण प्रसंगी देशगीत गाऊन ध्वजाला सलामी दिली आणि स्वातंत्र्य लढ्यात शहीद झालेल्या शुरवीरांसाठी गीत गाऊन त्यांना मानवंदना दिली. ध्वजारोहण नंतर मा. आयुक्त यांच्या हस्ते मिरा भाईंदरचे सुपुत्र शहीद मेजर कौस्तुभ राणे यांच्या शुरमाता व शुरपिता यांचा सन्मान करण्यात आला. तसेच मा. आयुक्त यांनी शहरातील नागरिकांना प्रजासत्ताक दिनाच्या शुभेच्छा देत स्वातंत्र्यलढ्यात शहीद झालेल्या वीरांना मानवंदना दिली. तद्नंतर उपस्थित सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांनी तंबाखू व धूम्रपान वापर विरोधात शपथ घेतली. सदर प्रसंगी मा. आयुक्त यांनी महापालिका प्रशासनमार्फत पुरविल्या जाणाऱ्या सर्व सेवा- सुविधांचा लाभ हा १ फेब्रुवारी २०२४ रोजी पासून ऑनलाईन द्वारे नागरिकांना घर बसल्या सेवांचा उपभोग घेता येणार आहे. तसेच पूर्ण करण्यात आलेल्या विकासकामांची माहिती देत त्याचे सर्व स्तरावर कौतुक करत महापालिका प्रशासन व अधिकारी वर्ग यांचे अभिनंदन केले, त्याचबरोबर शहरात राबविण्यात येणाऱ्या स्वच्छ सर्वेक्षण, माझी वसुंधरा अभियानात शहरातील जास्तीत जास्त नागरिकांनी सहभाग नोंदवून मिरा भाईंदर शहराला देशातील नंबर वन शहर बनविण्यासाठी सहकार्य करावे असे आवाहन मा. आयुक्त तथा प्रशासक संजय श्रीपतराव काटकर (भा.प्र.से.) यांच्या वतीने करण्यात आले.